महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

सोमवार ■ २८ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०३७ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## उद्धव ठाकरेंच्या वाढदिवसानिमित्त राज - उद्धव ठाकरेंची पुन्हा बंधुभेट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

काही दिवसांपूर्वी मराठी मेळाव्याच्यानिमित्ताने एकत्र आल्यानंतर ठाकरे बंधू पुन्हा एकदा एकत्र आले आहेत. आज उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस आहे. त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मनसेप्रमुख राज ठाकरे हे मातोश्रीवर पोहोचले आहेत. काहीवेळापूर्वीच राज ठाकरे हे दादरमधील आपल्या निवासस्थानावरुन मातोश्रीकडे रवाना झाल्याची माहिती समोर आली होती. राज ठाकरे हे मातोश्रीवर जाणे हा अनेक अर्थांनी ऐतिहासिक क्षण मानला जात आहे. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडल्यानंतर राज ठाकरे हे काही निवडक प्रसंग सोडले तर ते मातोश्रीवर गेले नव्हते. शिवसेना सोडल्यानंतर राज ठाकरे हे जेव्हा जेव्हा मातोश्रीवर गेले होते, तेव्हा काहीतरी अपरिहार्य कारण होते. मात्र, आता राज ठाकरे हे पहिल्यांदाच स्वखुशीने मातोश्रीवर पोहोचले. शिवसेना सोडल्यानंतर राज ठाकरे आणि मातोश्रीची ताटातूट झाली होती. मात्र, आता राज ठाकरे हे अनेक वर्षांनी मातोश्रीवर पाऊल ठेवणार आहेत. हा महाराष्ट्रातील राजकारणाच्या नव्या अध्यायाचा श्रीगणेशा ठरण्याची शक्यता आहे. मराठी मेळाव्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात मनसे-ठाकरे गटाच्या युतीच्यादृष्टीने कोणत्याही ठोस हालचाली झाल्या नव्हत्या. त्यामुळे ठाकरे बंधूंची युती बारगळणार का, असा प्रश्न विचारला जात होता. मात्र, राज ठाकरे आता मातोश्रीवर जाणार असल्याने ठाकरे गट-मनसे युतीच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. राज ठाकरे यांची मातोश्रीवर जाण्याची कृती अनेक अर्थांनी महत्त्वाची मानली जात आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना आणि मनसे एकत्र येण्याची शक्यता वाढली आहे.

### ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याच्या शक्यतेमुळे शिंदेसेनेतील पक्षप्रवेश घटले ?

दर आठ- पंधरा दिवसांनी होणारे शिवसेना (शिंदे) पक्षातील प्रवेश गेल्या काही दिवसांपासून थांबले असल्याची चर्चा आहे. विशेषतः मुंबईतील माजी नगरसेवकांचे पक्ष प्रवेश थांबले आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकत्र येण्याच्या शक्यतेमुळे मुंबईतील पक्षप्रवेशांना ओहोटी लागल्याची चर्चा सुरू आहे. महापालिका निवडणूक लवकरच जाहीर होण्याची शक्यता असून पालिकेच्या निवडणुकीत या दोन बंधूंची युती झाली तर त्याचा सर्वाधिक फटका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला बसू शकतो, असा अंदाज आहे. सध्या मराठीच्या मुद्द्यावर का होईना, ठाकरे बंधू एकत्र आल्यामुळे त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आणि आशा निर्माण झाली आहे.

### 19 जूननंतर एकाही माजी नगरसेवकाचा पक्ष प्रवेश नाही...

दुसऱ्या बाजूला आतापर्यंत दर आठ-दहा दिवसांनी होणारे ठाकरेंच्या गटातील माजी नगरसेवकांचे पक्षप्रवेश सध्या थांबलेले दिसत आहेत. ठाकरे यांच्याकडून शिंदे यांच्याकडे जाणारा ओघ आटला असल्याची चर्चा आहे. उद्धव ठाकरे यांनी माजी नगरसेवकांची बैठक घेतली त्याच्या दुसऱ्याच दिवशी माजी चांदिवलीतील माजी नगरसेवक विजेंद्र शिंदे, विभागप्रमुख अजित भंडारी यांनी पक्षाला जय महाराष्ट्र करीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश केला. आदल्या दिवशी बैठकीला आलेला नगरसेवक आपल्याकडे खेचून शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना आव्हानच दिले होते. मात्र त्यानंतर मुंबईतील एकाही माजी नगरसेवकाचा पक्ष प्रवेश झाला नाही.



उद्धव ठाकरे यांचा आज वाढदिवस आहे, त्यांना शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे मातोश्रीवर गेले ही आनंदाची बाब आहे. यात राजकीय का पाहता? आमच्याही उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा आहेत. वाढदिवसाच्या दिवशी शुभेच्छा द्यायला जाणं, यात राजकारण पाहणं योग्य नाही. महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला विधानसभेच्या निवडणुकीत दिसलं आहे आणि महाराष्ट्राच्या मनात काय आहे, हे तुम्हाला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही दिसेल; मात्र काही पक्षांच्या नेत्यांच्या मनात काय आहे, हे महाराष्ट्राच्या मनातलं आहे असे म्हणणे योग्य नाही. हे फार मोठे स्टेटमेंट होईल

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## थोडक्यात महत्वाचे



## ग्रामपंचायत हद्दीच्या वादात अडकली आदिवासी वस्ती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा :** तालुक्यातील कुडूस गावाच्या पश्चिमकडे तर चिंचघर गावाच्या पूर्वेला 25 लोकवस्ती असलेली आदिवासी वस्ती आहे. या वस्तीला बाजारपेठ कुडूस आहे तर रेशनिंगसाठी चिंचघर येथे जावे लागते. वस्तीपासून कुडूस दोनशे फूटाच्या अंतरावर तर चिंचघर एक किमी दूर. कुडूस येथे ओहळाच्या पाण्यातून जाण्यासाठी कसरत करावी लागते तर चिंचघर येथे जाण्यासाठी एक किमी पायपीट करावी लागते. रस्ता नाही, वीज नाही जीवनावश्यक पाणी नाही. या सुविधांअभावी संघर्ष सुरूच आहे.

चिंचघर ग्रामपंचायतीने येथील नागरिकांना घरकुलाचा लाभ दिला आहे. पण भौतिक सुविधांची वाणवा आहे. कुडूस ग्रामपंचायतीने ओहळावर साकव बांधावा म्हणजे आम्हाला बाजार आणि शैक्षणिक सुविधांचा लाभ घेता येईल असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. चिंचघर पाडा येथील कुपनलीकेवर दोन किमी अंतरावर पिण्याचे पाणी घेण्यासाठी पायपीट करावी लागते असे येथील महिलांनी सांगितले. चिंचघर ग्रामपंचायतीने आमच्या वस्तीजवळ कुपनलीका खोदली तर आमची पिण्याच्या पाण्यासाठी होणारी पायपीट थांबेल. अथवा कुडूस ग्रामपंचायतीने कायद्यावर बोट न ठेवता 20 फूटावर असलेल्या जयश्री नगरच्या पाईपलाईन वरून नळजोडणी दिली तर आमची पाण्याची ददात मिटेल. असे येथील नामी बरफ यांनी सांगितले. साकव, नळजोडणी, वीजपुरवठा, रस्ता या बाबत तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी दोन्ही ग्रामपंचायतींना समज द्यावी. अशी मागणी येथील आदिवासी बांधवांनी केली आहे.

## पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** पर्यावरण मंत्री ना.पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा उपक्रम अभियान अंतर्गत आज रविवार (दि.२७ )रोजी वंजारी सेवा संघ(असो)परिवार,मांडा-टिटवाळा भाजपा(भटके विमुक्त आघाडी)मोहने-टिटवाळ मंडळ,राष्ट्रसंत भगवानबाबा सामाजिक समरसता प्रतिष्ठाण,टिटवाळा आणि जिजाई प्रतिष्ठाण महाराष्ट्र,टिटवाळा यांच्या वतिने खाऊ आणि फळे वाटप कार्यक्रम आयोजित केला होता. सकाळी १० वा. ग्रामीण रुग्णालय, गोवेली, ता. कल्याण येथे रुग्नांना फळे वाटप करण्यात आले. तसेच पाल वस्ती, मांडा(पश्चिम) येथील मुलांना फळे व खाऊ वाटप करुन पंकजाताई यांचा जन्मदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी कडोंमपा मा. उपमहापौर उपेक्षा भोईर, भाजप टिटवाळा मंडळ अध्यक्ष शक्तिवान भोईर, अनिल फड, भाजपा भटके विमुक्त आघाडी कल्याण जिल्हाध्यक्ष विष्णू सांगळे , जिजाई प्रतिष्ठाण महाराष्ट्र अध्यक्ष संजय पारेकर, भाजपा भटके विमुक्त आघाडी टिटवाळा मंडळ अध्यक्ष विजय आव्हाड, विनोद इंगळे (IDBI बँक व्यवस्थापक), वंजारी सेवा संघ (असोसिएशन) कल्याण पश्चिम अध्यक्ष मोहन आव्हाड, शामकुमार गिरी , शिवाजी चकोर, गणेश म्हसकर आदी उपस्थित होते.

## लाडकी बहिणी योजनेवर १४,२९८ पुरुषांचा डल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ऑगस्ट २०२४ मध्ये म्हणजेच गेल्या वर्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु झाली होती. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तेव्हा एकनाथ शिंदे होते. या योजनेच्या अंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्यात आले. या योजनेचा लाभ पात्र नसणाऱ्या महिलांनी तर घेतलाच शिवाय १४ हजारांहून अधिक पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतल्याची धक्कादायक बाब या योजनेच्या छाननीतून समोर आली आहे. अपात्र महिलांना या योजनेतून काढून टाकण्यात आलं आहे. दरम्यान १४ हजार २९८ पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभघेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.



> दरम्यान सरकारने २६.३४ लाख लाडक्या बहिणींना अपात्र केले असले तरी पात्र असलेल्या सुमारे २.२५ कोटी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना जून २०२५ महिन्याचा सन्माननिधी वितरित करण्यात आला आहे, असेही आदिती तटकरे यांनी सागितले.

### किती पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचं समोर ?

१४,२९८ पुरुषांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला. त्यांना दरमहा २ कोटी १४ लाखांहून अधिक रक्कम वाटली गेली जी रक्कम सध्याच्या घडीला २१ कोटी ४४ लाखांच्या घरात आहे. ऑगस्ट २०२४ पासून छाननी होईपर्यंत हा लाभ पुरुषांना मिळाल्याचं समोर आलं आहे. सार्वजनिक वितरण प्रणालीतील माहिती तपासल्यावर आणखी धक्कादायक गोष्टी समोर आल्या २ लाख ३६ हजार १४ लाभार्थ्यांच्या नावांमध्ये संशय आहे. ते पुरुष असून त्यांनी महिलांच्या नावाने लाभ घेतला असावा, असा संशय आहे. ज्या १४,२९८ पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला, त्यांना दरमहा मिळणारं १५०० रुपये मानधन आता बंद करण्यात आलं आहे. योजनेत झालेल्या या गैरप्रकारामुळे महिलांच्या योजनेतून पुरुषांनी अर्ज करुन पैसे कसे मिळवले, हे शोधण्यासाठी आता कागदपत्रांची छाननी सुरू करण्यात आली आहे.

### नियम डावलून महिलांनीही पैसे घेतल्याचे प्रकार छाननीत समोर

नियमानुसार ६५ वर्षांवरील व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळत नाही. तरीही, २ लाख ८७ हजार ८०३ वयोवृद्ध महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. या महिलांनांही या योजनेच्या अंतर्गत कोट्यवधी रुपये मिळाल्याचं छाननीत लक्षात आलं आहे. एका कुटुंबातील दोनपेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ मिळत नाही. असं असतानाही, ७ लाख ९७ हजार ७५१ कुटुंबांतील दोनपेक्षा जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. त्यांना १,१९६ कोटी ६२ लाख रुपये मिळाले असल्याचं समोर आलं आहे.

## कचोरे टेकडीवर संरक्षक भिंत कोसळली - सहा घरांचे नुकसान

### पालिकेच्या सतर्कतेने जीवितहानी टळली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** डोंबिवली जवळील ९० फुटी रस्ता भागातील कचोरे येथील टेकडीवरील संरक्षक भिंतीला संततधार पावसामुळे तडे गेले होते. या संरक्षक भिंतीच्या आडोशाने उभ्या असलेल्या बेकायदा चाळीला त्यामुळे धोका निर्माण झाला होता. मागील पाच दिवसांपासून पडत असलेल्या मुसळधार पावसाने रविवारी संरक्षक भिंती कोसळून त्या लगतच्या चाळीचा पाठीमागील भाग खचला.

कल्याण डोंबिवली पालिकेच्या फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी मे मध्ये पावसाळ्यापूर्वी कचोरे टेकडी परिसराचा दौरा केला होता. त्यावेळी त्यांना संरक्षक भिंतीला तडे गेल्याचे आणि या भागातील बेकायदा चाळीला धोका निर्माण होणार असल्याचे जाणवले होते. त्यांनी रहिवाशांना अन्य भागात स्थलांतरित होण्यास सागितले होते. त्या सूचनेप्रमाणे रहिवासी अगोदरच अन्य भागात स्थलांतरित झाल्याने जीवित हानी झाली नाही. रविवारी पाऊस सुरू असताना कचोरे टेकडीवरील आश्रम भागातील धोकादायक झालेल्या संरक्षक भिंतीचा भाग कोसळला. त्या बरोबर या भिंतीलगत असलेल्या चाळीचा पाठीमागील भाग खचला. या चाळी रहिवासमुक्त असल्याने जीवित हानी झाली नाही.



> कचोरे टेकडी भागातील रहिवाशांना पावसाळ्यापूर्वी सावधगिरीच्या नोटिसा पाठविण्यात आल्या आहेत. कचोरे टेकडीवरील आश्रम परिसरातील एका संरक्षक भिंतीला तडे गेल्याचे आणि तेथील चाळीला धोका असल्याचे यापूर्वीच निदर्शनास आल्याने चाळ यापूर्वीच रहिवास मुक्त केली आहे. त्यामुळे भूस्खलन झाल्यानंतर जीवित हानी झाली नाही. भूस्खलन झालेल्या भागातील बेकायदा चाळ जमीनदोस्त करण्यात आली.
>
> - हेमा मुंबरकर, साहाय्यक आयुक्त, फ प्रभाग



## आमदार किसन कथोरे यांची किल्ले शिवनेरीवर स्वच्छता पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र राज्यातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा किल्ल्याचा समावेश युनेस्को च्या जागतिक वारसा स्थळाच्या यादीत करण्यात आला हे आपल्या महाराष्ट्राच्याच नाही तर भारत देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची व अभिमानाची गोष्ट आहे त्यासाठी मुरबाड विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन कथोरे यांनी मतदार संघातील नगरसेवक, प्रमुख पदाधिकाऱ्यांसमवेत शिवनेरी किल्यावर जाऊन स्वच्छता केली पाहणी केली तसेच राज्यातील गड किल्यांच्या संवर्धाना साठी शपथ ग्रहण केली त्याच प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजी अशा घोषणानी परिसर दुमदुमून निघाला.












## जीवनदीप महाविद्यालयात आदिवासी बांधवांना मोफत अन्नधान्य वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

आदिवासी बांधवांना पोषण युक्त अन्नधान्य मिळावा या उद्देशाने जीवनदीप महाविद्यालयात योगा विद्या प्रणिक हीलींग फाउंडेशन ऑफ महाराष्ट्र या सर्व संस्थेच्या अंतर्गत आदिवासी बांधवांना मोफत पोषण युक्त धान्य वाटप करण्याचा कार्यक्रम राबविण्यात आला. सदर कार्यक्रमात जीवनदीप महाविद्यालयात २६-०७-२०२५ रोजी घेण्यात आला या कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर जगदीश पाटील (सहाय्यक प्रकल्प अधिकारी) डॉ. प्रशांत पाटील (जुपिटर हॉस्पिटल ठाणे) सुनील काटकर हे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांनी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले ;तसेच मान्यवर व अध्यक्षांची भाषणे झाल्यानंतर ग्रामपंचायत पोई, ग्रामपंचायत चौरे, ग्रामपंचायत म्हसरोंडी, ग्रामपंचायत आपटी येथील उपस्थित आदिवासी बांधवांना मोफत पोषण युक्त धान्य वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात जीवनदीप महाविद्यालयाच्या एन एस एस विभाग व स्वयंसेवकांनी सदर कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी सहकार्य केले महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, संचालक. प्रशांत घोडविंदे, एन एस एस विभाग प्रमुख. दिनेश धनगर व प्राध्यापक वर्गांचे विशेष सहकार्य लाभले यांच्या सर्वांचे सहकार्याने सदर कार्यक्रम यशस्वी इतर संपन्न झाला.

## वाचक मनोगत

# जागतिक निसर्ग संवर्धन

### निसर्गरक्षण हीच खरी शाश्वत प्रगती

पर्यावरण संरक्षणात स्थानिक समुदायांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. अनेक आदिवासी समुदाय आणि ग्रामीण भागातील लोक शतकानुशतके निसर्गासोबत सहजीवन जगत आले आहेत. त्यांच्याकडे पर्यावरणाचे जतन करण्याच्या अनेक पारंपरिक पद्धती आहेत, ज्यांचा अवलंब करून आपणही निसर्गाचे रक्षण करू शकतो. स्थानिक गावपातळीवर जैवविविधता व्यवस्थापन समित्या, 'पर्यावरण संरक्षण समित्या' तयार करून लोकसहभागातून पाणवठ्यांचे संवर्धन, मंदिरांच्या आजूबाजूला वृक्षारोपण, ओला-सुका कचरा वेगळा करणे, जलसाठवण योजना आणि कंपोस्ट खत निर्मिती असे उपक्रम राबवू शकतो. यामध्ये महिला, युवक मंडळे, शेतकरी गट यांचा सहभाग घेणे आवश्यक आहे. निसर्ग म्हणजे केवळ जंगल नाही; तर तो आपल्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे हे आपल्या कृतीतून स्पष्ट झाले पाहिजे.

निसर्ग संवर्धन म्हणजे केवळ झाडे लावणे किंवा पाण्याची बचत करणे इतकेच नाही, तर त्यात नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करणे, वन्यजीवनाचे जतन करणे, पर्यावरणातील प्रदूषणावर नियंत्रण ठेवणे आणि नैसर्गिक संसाधनांचा योग्य व शाश्वत वापर करणे इत्यादी बाबींचा समावेश होतो. निसर्ग संवर्धनासाठी प्रत्येक व्यक्तीने आपापल्या पातळीवर प्रयत्न करणे आवश्यक आहे. हे केवळ सरकार किंवा मोठ्या संस्थांची जबाबदारी नाही, तर प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. आपल्या दैनंदिन सवयींमध्ये छोटे बदल करूनही आपण निसर्गाच्या संरक्षणात मोठे योगदान देऊ शकतो.

भारतासारख्या विकसनशील देशात निसर्ग संवर्धनाचे महत्त्व अधिक आहे. आपल्या देशात विविध प्रकारची भौगोलिक परिस्थिती आणि समृद्ध जैवविविधता आहे. हिमालयाच्या बर्फाच्छादित शिखरांपासून ते दक्षिण भारतातील उष्णकटिबंधीय पर्जन्यवनांपर्यंत, आणि पश्चिम घाटातील जैवविविधतेपासून ते सुंदरबन्सच्या खारफुटीच्या जंगलांपर्यंत भारताची निसर्गसंपदा अद्वितीय आहे. परंतु, वाढती लोकसंख्या, अनियंत्रित औद्योगिकीकरण आणि वेगाने होणारे शहरीकरण यामुळे नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड दबाव येत आहे. जंगलतोड, नद्यांचे प्रदूषण, जमिनीची धूप आणि अनियोजित विकासामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. त्यामुळे, आपल्याला नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर कसा करायचा, यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

शेवटी, आपण हे समजून घेतले पाहिजे की मानव आणि निसर्ग अविभाज्य आहेत. आपले जीवन निसर्गावर पूर्णपणे अवलंबून असल्याने, त्यांच्यात सुसंवाद असणे महत्त्वाचे आहे. विकासाची गती थांबवण्याऐवजी, तो निसर्गाला पूरक असावा. जागतिक निसर्ग संवर्धन दिन ही केवळ औपचारिकता नसून, आपल्या जीवनशैलीत मोठे बदल घडवण्याची एक अमूल्य संधी आहे. आपण 'निसर्ग पूरक विकास' स्वीकारल्यास आपली पृथ्वी हरित, सुरक्षित आणि समृद्ध होईल. निसर्ग संवर्धन हे एक निरंतर कार्य असून, त्यात प्रत्येक व्यक्तीचा सहभाग आवश्यक आहे. आपल्या भावी पिढ्यांसाठी सुंदर निसर्ग जपणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. निसर्ग आपल्या गरजांचा स्रोत नसून, तो आपल्या अस्तित्वाचा आधार आहे. निसर्गाशिवाय मानवी जीवन अशक्य आहे. म्हणून, या दिनानिमित्त वसुंधरेचे रक्षण करण्याचा निश्चय करूया. निसर्ग वाचेल, तरच आपण वाचू आणि आपले भविष्य सुरक्षित राहील ! चला, निसर्गरक्षण आपली जीवनशैली बनवूया.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# 'तो प्रामाणिक होता; पण त्याला पैसे मिळाले नाहीत'...

## एका कंत्राटदाराच्या अंताची करुण कहाणी




"गेल्या वर्षभरापासून दीड कोटी रुपयाची हर्षल पाटील यांची येणी प्रशासनाकडून थांबली होती. वारंवार या संदर्भात हर्षल हे मागणी करत होते मात्र ते मिळाले नाही. अशाप्रकारे राज्यभरातील सर्वच कॉन्ट्रॅक्टरचे ८९ हजार कोटी रुपये प्रशासनाकडून देणे आहे. वारंवार बैठकीसाठी आणि पैसे देण्याची मागणी करण्यात आली. मात्र जाणीवपूर्वक प्रशासन दुर्लक्ष करत आहे. कंत्राट दारांचे पैसे तात्काळ द्यावे. तसेच हर्षलच्या कुटंबीयांना न्याय द्यावा ही आमची मागणी आहे. अन्यथा पुढील काळात आमच्या सर्व संघटना मिळून तीव्र आंदोलन आम्ही करत आहोत"

**इंजि मिलिंद भोसले**
महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणीपुरवठा संघटना राज्य अध्यक्ष

वाळवा तालुक्यातील तरुण अभियंता हर्षल पाटील याने शासनाकडून मिळणाऱ्या थकित बिलांसाठी अनेक दिवस संघर्ष केला. पण अखेर शासनाच्या दुर्लक्षामुळे, अपमानामुळे आणि भ्रष्ट व्यवस्थेने दिलेल्या मानसिक छळामुळे हे पाऊल उचलावं लागलं. हा अपघात नाही... ही आत्महत्या नाही... ही सरकारच्या अपयशाची आणि सवेदनशून्यतेची थेट सजा आहे! आज सरकार रोजगार देऊ शकत नाही, तरी लोकांना स्वबळावर उभं राहायला लावतंय — पण त्यांचं कष्टाचं चीज करत नाही. कंत्राटं देताना मोठमोठे जाहिराती, भाषणं... पण पैसे देताना पूर्ण शांतता! एक कंत्राटदार आत्महत्या करतो म्हणजे त्याच्यासोबत अनेक घरं उध्वस्त होतात... कारण एका माणसाच्या पाठीमागे अनेक हात आणि पोटं असतात. आता फक्त शेतकरी नव्हे, तर कंत्राटदारही आत्महत्येच्या उंबरठ्यावर आहेत. सरकारने जर या थकित बिलांच्या प्रश्नाकडे गंभीरपणे न पाहिलं, तर यापुढे अजून अनेक हर्षल पाटील निर्माण होतील — आणि त्याचं संपूर्ण जबाबदारी राज्यकर्त्यांवर असेल.

22 जुलै 2025 ला वाळवा तालुक्यातील तांदुळवाडी गावातील 35 वर्षीय हर्षल पाटील या तरुण कंत्राटदरानं आपल्या शेतात आत्महत्या केली. कुटुंबीय आणि काही गावकरी शेतातील परिसरात गेले असता, हर्षल पाटील यांनी गळफास लावल्याचं दिसून आलं. यामुळे तात्काळ त्यांना रुग्णालयात नेण्यात आलं. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. हर्षल पाटलांच्या आत्महत्येने सध्या महाराष्ट्रचं वातावरण ढवळून निघालेले आहे. कंत्राटदार संघटनेनं दिलेल्या माहितीनुसार महाराष्ट्र शासनाच्या जलजीवन मिशन अंतर्गत राज्यात शासनानं हर घर जल ही योजना सुरू केली. या माध्यमातून अनेक सरकारी कामं काढली गेली सदर कामं सुशिक्षित बेरोजगार अभियंता, छोटे कंत्राटदारांनी घेतली. तसंच, सर्व कामं जवळपास पूर्ण ही केली. मात्र, कंत्राटदारांनी पूर्ण केलेल्या कामांची देयके देण्यासाठी शासनाकडे जवळपास एक वर्षांपासून निधीच उपलब्ध नाही. तसेच केंद्रानेही निधी देऊ शकत नाही असं पत्र राज्य शासनास धाडले. याचाच गंभीर आर्थिक परिणाम तरूण उद्योजक आणि जलजीवन मिशनचे कंत्राटदार हर्षल पाटील यांच्यावर झाला होता असे नातेवाईक, ग्रामस्थ आणि कंत्राटदार संघटना सांगतात. स्वतःच्या शेतात जाऊन गळफास घेऊन आत्महत्या करून हर्षल यांनी आपलं जीवन संपवलं. हर्षल यांचे शासनाकडे जवळपास 1.40 कोटींचे देयके प्रलंबित होते.

तसंच, सावकार व इतर आर्थिक लोकांकडून त्यांनी जवळपास 65 लाखांचं कर्ज घेतलं होतं असे नातेवाईक सांगतात.

घेतलेले पैसे अनेक लोक परत करण्याचा तगादा लावत होते. त्यामुळे हर्षल पाटील यांना घर चालवणं आणि पुढचं भविष्य याची चिंता भेडसावत होती, असं नातेवाईक आणि कंत्राटदार संघटनेनं सांगितलं. हर्षल हेच घरातील मोठे पुत्र होते. त्यांच्या पाठीमागे पत्नी, पाच वर्षांची मुलगी, दोन लहान भाऊ आणि आई-वडील असा परीवार आहे. त्यामुळे घराचा उदरनिर्वाह कसा करायचा, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा होता. त्यामुळेच आर्थिक विवांचनेतून त्यांनी हे पाऊल उचललं असं हर्षल यांचे नातेवाईक, महाराष्ट्र राज्य कंत्राटदार संघटनेने आणि ग्रामस्थांनी माहिती दिली.

### कंत्राटदारांमध्ये संतापाची लाट

हर्षल पाटील यांच्या आत्महत्येनंतर राज्यभरात कंत्राटदारांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. हर्षल प्रमाणेच इतर कंत्राटदार देखील असे टोकाचे पाऊल उचलण्याची भीती महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व्यक्त करत आहे. त्यामुळे थकीत हजारो कोटी रुपयाची बिल प्रलंबित राहिल्यामुळे कंत्राटदार आपले जीवन संपवून टाकतील व त्यांचे कुटुंब नाहक आर्थिक अडचणीत आल्याने शासनास फार मोठी किंमत चुकवावी लागेल असा इशारा महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य ग्रामीण पाणीपुरवठा संघटना राज्य अध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले, महासचिव सुनील नागराळे व सर्व पदाधिकारी यांनी शासनास परिपत्रक काढत इशारा दिला आहे.

# दिव्यांग विद्यार्थ्यांनी बनवलेल्या राख्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)** आई डे केअर संस्थेच्या निवासी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्रातील मतिमंद विद्यार्थ्यांनी रक्षाबंधना निमित्त स्वतः बनवलेल्या २१ हजार राख्यांना भरघोस प्रतिसाद मिळाला आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आत्मनिर्भरतेचा आणि सन्मानाने उदरनिर्वाहाचा मार्ग खुला झाला आहे. विविध शाळा, कॉलेज,कंपन्यांमध्ये, सामाजिक मंडळांमध्ये आणि स्थानिक तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्टॉल्स उभारण्यात आले.या यशस्वी उपक्रमात श्री. जितेंद्र नाले श्री. खीरे श्री. विजय गोरेगावकर यांनी प्रचार व विक्रीसाठी विशेष मेहनत घेतली. डॉक्टर समिधा गांधी, वंदना पवार, मनोज मेस्त्री, ज्योती मगदूम, अनुष्का खराडे आणि जांभेकर दांपत्य यांचे देखील मोलाचे योगदान लाभले.या उपक्रमात सहभागी झालेल्या विशेष विद्यार्थी कर्मचारी आणि विशेष शिक्षक कर्णबधिर सहाय्यक, काळजी वाहक यांचाही खूप मोठा सहभाग होता.या सामूहिक प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांना सध्या ७,००० रुपयांपर्यंत मानधन देणे शक्य झाले असून, लवकरच हे मानधन १०,००० रुपयांपर्यंत नेण्याचा संस्थेचा मानस आहे.



**संस्थापिका स्वाती मोहिते, मुख्याध्यापिका व अध्यक्षा प्रेमलता पाटील आणि चैताली व्यावसायिक युनिट च्या प्रमुख विद्या खराडे यांनी सर्व कार्यकर्ते, शिक्षक, पालक, व दात्यांचे आभार मानले आणि भविष्यातही असेच सहकार्य लाभावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.**

# दिल्लीत छत्रपती शिवरायांच्या सामर्थ्याचा गौरव

## मुख्यमंत्री फडणवीसांच्या हस्ते अध्यासन केंद्राची पायाभरणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जेएनयू, नवी दिल्ली येथे 'श्री छत्रपती शिवाजी महाराज संरक्षण आणि सामरिक विशेष अध्यासन केंद्रा'ची पायाभरणी आणि 'कुसुमाग्रज मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती विशेष केंद्रा'चे उदघाटन संपन्न झाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ मराठी नव्हे, तर संपूर्ण भारताचे सार्वकालिक प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या अद्वितीय सामरिक योजनांचा आणि स्थापत्यशास्त्राचा युनेस्कोने 'मराठा मिलिटरी लँडस्केप' म्हणून गौरव करत १२ किल्ल्यांना जागतिक वारसा यादीत समाविष्ट केले, हे अत्यंत गौरवाचे आहे. मराठ्यांच्या जाज्वल्य लढ्यांपासून पानिपतच्या बलिदानापर्यंत, संपूर्ण भारतासाठी लढण्याची त्यांची विजिगीषू वृत्ती ही या अध्यासन केंद्रात अभ्यासली जाणार आहे. युद्धनीती, संरक्षणशास्त्र आणि स्वराज्यनिर्मितीचा हा वारसा जेएनयूमध्ये अभ्यासाचा विषय ठरणार, ही अभिमानाची गोष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

# जिर्ण पाईपलाईनवर कचरा टाकल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)**

पेण तालुक्यातील वाशी खारेपाट विभागात पिण्याच्या पाण्याच्या मुख्य जलवाहिनीतून (पाईपलाईन) होणारा पुरवठा जनतेच्या आरोग्यासाठी गंभीर धोक्याचा विषय ठरत असल्याचा संतप्त आरोप पेण खारेपाटांतील स्थानिक नागरिकांनी केला आहे. वाशीनाका ते वाशी व वढाव गावापर्यंतची ही जलवाहिनी अतिशय जुनी, जिर्ण व नादुरुस्त अवस्थेत असून, जागोजाग फुटलेल्या या पाईपलाईनवर काही वर्षांपासून नियमितपणे कचरा टाकला जात आहे. विशेष म्हणजे उंबर्डे ग्रामपंचायत, जी या पाईपलाईनपासून पाच ते सहा किलो मीटर दूर आहे, यांचा कचरा देखील ट्रॉलीने आणून या जिर्ण पाईपलाईनवर टाकला जातो आहे.

या कचऱ्यामुळे जलवाहिनीमधून वाहणारे पाणी दुर्गंधयुक्त, विषाणूजन्य दूषित पाण्यात परिवर्तित होत असून, हेच पाणी खारेपाटांतील सर्व गावं व वाड्यांमध्ये पोहोचत असल्यामुळे जुलाब, उलटी, टायफॉइड, गॅस्ट्रो, कावीळ यांसारख्या साथीचे आजार उद्भवण्याचा मोठा धोका निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी याच काळांत कावीळ या आजारामुळे या परिसरांतील चार निष्पापांचा मृत्यू झाला आहे. पाणीपुरवठा विभागाने या पाईपलाईनच्या दुरुस्तीकामी बिलं फुगवून काढण्या व्यतिरिक्त दुरुस्तीबाबत हवीतशी कोणतीही ठोस कार्यवाही केली नाही, तर वैद्यकीय यंत्रणांकडून देखील या संभाव्य आरोग्य धोक्याबाबत कोणतीही जाहीर सूचना किंवा साक्ष, पत्रव्यवहार संबंधीतांना करण्यात येत नाही, हे विशेष.या प्रकारामुळे वाशी खारेपाट विभागातील नागरिकांमध्ये प्रचंड संताप असून, अनेकांनी "जनतेच्या जिवाशी खेळ करणाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा" अशी तीव्र मागणी केली आहे. पाईपलाईन मधून कचऱ्याच्या संपर्काने दुर्गंधीयुक्त पाणी परत नागरिकांच्या नळातून नागरीकांच्या घरात पोहोचत आहे, ही परिस्थिती सहन करण्याच्या पलीकडे गेली असल्याने, ग्रामपंचायतींच्या गलथान कारभाराविरोधात आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांकडून दिला जात आहे.

वर्षानुवर्षे चाललेल्या या निव्वळ निष्काळजीपणामुळे वाशी खारेपाट विभागाला साथीच्या रोगांचं संभाव्य केंद्र बनवण्याचा अक्षम्य अपराध ग्रामपंचायती व प्रशासनाने केल्याचा आरोप असून, या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे, अशी एकमुखी मागणी होत आहे. प्रशासनाने वेळेत जागृती न घेतल्यास, या भागात गंभीर आरोग्यसंकट ओढवेल आणि त्याची सर्व जबाबदारी स्थानिक प्रशासन व आरोग्य यंत्रणा यांच्यावर असेल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

पेणच्या वाशी खारेपाट विभागातील नागरिकांच्या आरोग्याशी खेळला जाणारा हा खेळ, चार निष्पापांच्या मृत्यनंतरही बंद होत नाही हे माफक दुर्लक्ष नाही, तर सदोष मनुष्यवधा सारखा गंभीर अपराध-गुन्हा आहे. पिण्याच्या पाण्यावर कचरा टाकून जिवंत लोकांना रोगाच्या खाईत ढकलणाऱ्या ग्रामपंचायती व प्रशासनाने तत्काळ दखल घ्यावी. अन्यथा, आरोग्याच्या या संकटाला उत्तरदायी ठरणाऱ्या सर्वांवर कायदेशीर कारवाई केल्याशिवाय खारेपाटांतील जनता स्वस्थ बसणार नाही. हे केवळ आरोग्याचेच नव्हे, तर जनतेच्या जगण्याच्या हक्काचे उल्लंघन आहे.

**- राजेंद्र झेमसे. वाशी, पेण - रायगड**

# कल्याणमधील वाहतुक कोंडी फोडण्यासाठी सहजानंद चौक परिसरात वाहतूक बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** वाहतूक कोंडीने त्रस्त झालेल्या कल्याण पश्चिमेतील कोंडी फोडण्यासाठी वाहतूक पोलीस उपायुक्तांनी एक अधिसूचना जारी केली आहे. या अधिसूचनेनुसार कल्याण पश्चिमेतील सर्वात व्यस्त चौकांपैकी एक असलेल्या सहजानंद चौकातील वाहतुकीमध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत. कल्याणमधील वाहतूक कोंडी संदर्भात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे माजी आमदार प्रकाश भोईर आणि त्यांच्या शिष्टमंडळाने काही दिवसांपूर्वी कल्याणमध्ये वाहतूक विभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांची भेट घेतली होती. यावेळी सहजानंद चौक येथील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी काही बदल करण्याच्या सूचना मनसेचे पदाधिकारी गणेश चौधरी, कपिल पवार आणि गणेश लांडगे यांनी केल्या होत्या. त्यांच्या या सूचनेनुसार वाहतूक पोलिसांनी याठिकाणी काही बदल केले आहेत.

कल्याण पश्चिमेतील सहजानंद चौक हा अतिवर्दळीचा रस्ता असुन याठिकाणी संतोषी माता रोड, आग्रा रोड, अहिल्याबाई चौकाकडे जाणारा रोड, काळा तलाव आणि काळी मशिदीकडे जाणारा असे एकुण 6 रस्ते एकत्र येतात. त्यापैकी सहजानंद चौकाकडुन संतोषी माता रोडमार्गे रामबागकडे जाणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात रहदारी असल्याने याठिकाणी वाहतूक कोंडी होत असते. या पार्श्वभूमीवर सहजानंद चौकात वाहतूक कोंडी होऊ नये आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी वाहतूक पोलिस उपायुक्त पंकज शिरसाट यांच्याकडून हे बदल करण्यात आले आहेत.

सहजानंद चौकातून संतोषी माता रोडमार्गे रामबागकडे जाणाऱ्या वाहनांना सहजानंद चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. त्याऐवजी मकबरा चौक येथे वळून ही वाहने ही सहजानंद चौक मकबरा रोडने पुढे जावुन साती आसरा मंदिरमार्गे वळण घेवुन पुढे संतोषी माता चौक येथुन रामबागकडे जाऊ शकतील.



चिकणघरकडुन काळा तलावमार्गे सहजानंद चौककडे येणाऱ्या वाहनांना साती आसरा मकबरा चौक येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे. त्याऐवजी ही वाहने साती आसरा मकबरा चौकमार्गे डावे वळण घेवुन संतोषी माता चौकमार्गे इच्छित स्थळी जाऊ शकतील.

संतोषी माता चौक (कल्याण पोळी भाजी केंद्र) ते सहजानंद चौक मार्ग हा रामबागकडुन संतोषी माता रोडमार्गे सहजानंद चौकाकडे जाणाऱ्या वाहनांना एकदिशा मार्ग करण्यात येत आहे. तसेच ही अधिसुचना मंजूर दिनांकापासून ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत असल्याचेही वाहतूक पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

तसेच या अधिसुचनेबाबत काही हरकती अगर सुचना लेखी स्वरुपात पोलीस उप आयुक्त, शहर वाहतुक शाखा, कार्यालय, तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, ठाणे-४००६०२ येथे प्राप्त झाल्यास त्या विचारात घेवून अधिसूचना कायम करण्याबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

तर ही वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड रुग्णवाहिका आणि इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

# अखेर कल्याण पूर्वेतील वादग्रस्त अतिक्रमणावर केडीएमसीची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील प्रभाग ड कार्यालया जवळील भारतरत्न डॉ . बाबासाहेब आंबेडकर ज्ञान केंद्राच्या आरक्षित भूखंडावर केंद्राला लागूनच एका सामाजिक संस्थेने कच्च्या स्वरूपातील अनधिकृतपणे बांधकाम करून संस्थेचे कार्यालय सुरू केले होते. या अनधिकृत बांधकावर प्रभाग ५ ड चे सहाय्यक आयुक्त उमेश उमगर यांनी अखेर कारवाई करून हा भूखंड गुरुवारी अतिक्रमण मुक्त केला आहे .

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि तद्कालीन नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रयत्नाने प्रभाग ड कार्यालया शेजारी सुमारे २१ कोटी निधीतून स्मारक निर्माण करण्यात आले आहे. या स्मारकाचे काम चालु असतांना स्मारकाच्या बाजुलाच कामगारांनी रहाण्यासाठी पत्राशेडचा निवारा निर्माण केला होता परंतु स्मारकाचे बांधकाम संपुष्टात आल्यानंतर कामगार पत्राशेड जैसेथे ठेवून निघून गेले. याच पत्राशेडचा २७ सदस्य असलेल्या 'मॉर्निंग वॉक सामाजिक संस्था ' या संस्थेने अनधिकृतपणे ताबा घेवून आपले कार्यालय सुरु केले होते.

हे पत्राशेड स्मारकाच्या सौंदर्यात बाधा निर्माण करत असल्याने तसेच भविष्यात अशाच प्रकारची स्मारकाच्या अवती भवती अन्य अतिक्रमणे उभी राहू शकतात ही शक्यता असल्याने सामाजिक कार्यकर्ते विनोद तिवारी यांनी या अनधिकृत बांधकामाची महापालिकेकडे लेखी तक्रार करून हे स्मारकासाठी अनावश्यक असलेले पत्रा शेड निष्कासित करून स्मारकाची जागा रिकामी करण्याची तक्रार केली होती.

या तक्रारीची शहानिशा करून प्रभाग ५ ड चे सहाय्यक आयुक्त उमेश उमगर यांनी संबंधीत संस्था चालकांना कायदेशीर नोटीस देवून सदरचे अतिक्रमण काढून घेण्याचा आदेश दिला होता. संस्था चालकांनी या नोटीसला अनुसरून कार्यालयातील सर्व सामान काढून घेतल्या नंतर उमेश उमगर यांनी बुधवार आणि गुरुवार या दोन दिवसात सदरचे अतिक्रमण निष्कासित करून स्मारकाच्या आरक्षित जागा रिकामी केली आहे.



**सोमवार**
**२८ जुलै २०२५**

| मेष | वृषभ | मिथुन | कर्क |
|---|---|---|---|
| व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल. आज तुमचा दिवस संमिश्र जाणार आहे. संकोच करु नका. | पालकांचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. तुमच्या मुलाच्या यशाने तुम्ही आनंदी व्हाल. | तुम्ही गंभीर बाबी शांततेने आणि संवादाने सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. थोडे भावूकही होऊ शकता. | घाईघाईने कोणताही निर्णय न घेणे चांगले. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. प्रसन्नता जाणवेल. |
| **सिंह** | **कन्या** | **तूळ** | **वृश्चिक** |
| मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. | प्रॉपर्टीशी संबंधित लोकांना फायदा होईल. आज अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. | आज तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन प्रोजेक्ट मिळेल, जो तुम्ही पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. | कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी लक्षणीय दैदिप्यमान यश मिळेल. |
| **धनु** | **मकर** | **कुम्भ** | **मीन** |
| दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. या राशीच्या अभियंत्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. | योग्य दिशेने कठोर परिश्रम केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये यश मिळेल. थकवा जाणवेल. | आज व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणार आहे . दिवस खूपच आनंदाचा जाणार आहे. | कार्यालयात अधिकारी तुमच्या कामावर खुश राहतील. तुमच्या आवडीच्या लोकांच्या भेटी होतील. |

## २८ जुलै दिनविशेष

१९३४ : पं. मदनमोहन मालवीय आणि बापूजी अणे यांनी काँग्रेस राष्ट्रीय पक्षाची स्थापना केली.

१९७९ : भारताच्या ५व्या पंतप्रधानपदी चौधरी चरणसिंग यांची नियुक्ती.

१९९९ : भारतीय धवल क्रांतीचे शिल्पकार डॉ. वर्गीस कुरियन यांना पालोस मार ग्रेगोरिओस पुरस्कार प्रदान.

# म्हसकळचे सामाजिक कार्यकर्ते भगवान कोर यांना मातृशोक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण तालुक्यातील म्हसकल गावाचे सामाजिक कार्यकर्ते श्री भगवान बाळकृष्ण कोर यांच्या मातोश्री कै. यमूबाई बालकृष्ण कोर यांचं वृद्धकालाने आकस्मित असं निधन झाले आहे तरी त्यांची अंत्ययात्रा सकाळी ठीक 10 वाजता म्हसकल येथून निघणार आहे ईश्वर त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती देवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना फळेगाव ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली



# ठाणे जिल्हाधिकारी पदासाठी राजकीय लॉबिंग ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** मुंबईपाठोपाठ महत्वाचा जिल्हा असलेल्या ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. अशोक शिनगारे हे 31 जुलैला सेवा निवृत्त होत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी कोणाच्या मर्जीतील असेल याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. त्याचबरोबर काही वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून ठाणे जिल्हाधिकारीपदी वर्णी लावण्यासाठी प्रयन्त सुरु झाले आहेत.

राजकीय घडामोडींचे केंद्रबिंदू असलेल्या ठाण्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपमध्ये छुपे शीतयुद्ध सुरु आहे. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना जिल्हाधिकारी म्हणून अशोक शिनगारे यांनी सूत्रे स्वीकारली आणि ठाणे जिल्ह्यातील महत्वाच्या निर्णयाला गती मिळावी. उपमुख्यमंत्री

**ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. अशोक शिनगारे हे 31 जुलैला सेवा निवृत्त होत आहेत. त्यामुळे जिल्हाधिकारी कोणाच्या मर्जीतील असेल याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.**

एकनाथ शिंदे, मंत्री शंभूराज देसाई, वनमंत्री गणेश नाईक, तत्कालीन मंत्री तथा भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, तत्कालीन मंत्री जितेंद्र आव्हाड या मंत्र्यांसोबत काम करताना जिल्हाधिकाऱ्यांची तारेवरची कसरत होत होती. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री झाल्यानंतर ठाणे हे राज्यातील राजकारणाचे दुसरे केंद्र बनले आहे. त्यामुळे ठाण्यावर कायमचे वर्चस्व ठेवण्यासाठी शिवसेना आक्रमक असून भाजपनेही जिल्हा काबीज करण्यासाठी व्यहरचना करीत 9 आमदार निवडून आणलेले आहेत. आगामी महापालिका निवडणुका होऊ घातल्या असून त्यादृष्टीने जिल्हाधिकारी पदावर आपल्या मर्जीतील अधिकारी असावा असे प्रयन्त शिवसेना आणि भाजपकडून सुरु असल्याची चर्चा आहे. महसूल खाते हे भाजपकडे असल्याने जिल्हाधिकारी हा आपल्या मर्जीतील अधिकारी असावा, याकरिता उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांची कसब लागणार आहे.

दुसरीकडे जिल्हाधिकारीपदी वर्णी लावण्यासाठी काही अधिकाऱ्यांनी प्रयन्त सुरु केले असून त्यांनी मंत्र्यांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे जिल्हाधिकारीपदी थेट आयएएस अधिकारी नियुक्त होणार का ? याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे.



## नवी मुंबई गुन्हे शाखेच्या उपायुक्तपदी सचिन गुंजाळ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत नव्याने तिसरे (बेलापूर) परिमंडळ स्थापन करण्यात आल्यामुळे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी पोलीस उपायुक्तांच्या बदल्या केल्या आहेत. नव्याने स्थापन केलेल्या बेलापूर २ परिमंडळाचे उपायुक्त म्हणून गुन्हे शाखेचे उपायुक्त अमित काळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या जागी गृहविभागाने सचिन गुंजाळ यांना पाठवले आहे. त्यामुळे नवी मुंबईत गुन्हे शाखेचे उपायुक्त कोण? या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. नवी मुंबईत नव्याने स्थापन करण्यात आलेल्या परिमंडळ २ मध्ये उपायुक्त म्हणून अमित काळे यांना पाठवले असले तरी परिमंडळ १ आणि ३ च्या उपायुक्तांना त्याच जागेवर कायम ठेवण्यात आले आहेत. काळे यांची गुन्हे शाखेतून बदली झाल्यानंतर या जागेवर कोणाची वर्णी लागणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. पोलीस मुख्यालयातील एका पोलीस उपायुक्ताचे नावही पुढे येत होते. मात्र गृहविभागाने अमित काळे यांच्या जागेवर सचिन गुंजाळ यांना पाठवले असून पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी गुंजाळ यांच्याकडे गुन्हे शाखेचा पदभार सोपवला आहे.

## वसई शहरात आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर
## पालिकेकडून बोगस डॉक्टरांवर कारवाईचा धडाका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** वसई विरार शहरात पुन्हा एकदा बोगस डॉक्टर सक्रिय झाले आहेत. नुकताच पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या पथकाने चिंचोटी येथे दोन बोगस डॉक्टरांच्या विरोधात कारवाई करून नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

वसई विरार शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. विविध ठिकाणी वाढते अनधिकृत बांधकामे व बैठ्या चाळी अशा दाटीवाटीच्या भागात बोगस डॉक्टर दवाखाने थाटू लागले आहेत. दिवसेंदिवस बोगस डॉक्टर शहरात सक्रिय होत असल्याने महापालिकेच्या आरोग्य विभागाने मोहीम हाती घेत आहे. यासाठी दोन पथके ही नियुक्त केली आहे. नुकताच धडक मोहिमेत चिंचोटी-कामण भागातील काही दवाखान्यांची तपासणी करण्यात आली आहे यात चिंचोटी भागात दोन बोगस डॉक्टर कोणत्याही प्रकारचा परवाना नसताना दवाखाना चालवीत असल्याचे आढळून आले आहे. परमहंस क्लिनिकचे सुनील कुमार यादव व ऋतुजा पाईल्स क्लानिकचे लिटन मृत्युंजय विश्वास अशा दोन बोगस डॉक्टरांचा समावेश आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता ३१८(४), सह वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३,३३ (अ) व औषधी द्रव्य व सौंदर्य प्रसाधन १९४० चे कलम १८ (सी), १८ (अ), २७ प्रमाणे नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. वसई विरार महापालिकेच्या कार्यक्षेत्रात बोगस वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांची शोध मोहीम सुरूच आहे. दोषी आढळून आल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाते असे पालिकेने सांगितले आहे. याशिवाय आपल्या परिसरात असे अवैध (बोगस) वैद्यकीय व्यवसायिक असल्याचे निदर्शनास आल्यास तातडीने जवळच्या नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात माहिती द्यावी असे आवाहनही नागरिकांना पालिकेने केले आहे.

### पाच वर्षात 28 बोगस डॉक्टरवर गुन्हे

**मागील काही वर्षांपासून शहरात बोगस डॉक्टर ही सक्रिय होऊ लागले आहेत. त्यामुळे हळूहळू त्यांचा सुळसुळाट वाढू लागला आहे. जानेवारी २०२० ते मार्च २०२५ या पाच वर्षाच्या कालावधीत सुमारे २८ बोगस डॉक्टरांची प्रकरणे महापालिकेच्या आरोग्य पथकाने उघड करून त्यांच्या विरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत.**



## 'मन की बात' कार्यक्रमात आ. किसन कथोरे तल्लीन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या कार्यक्रमाचा भाग नुकताच प्रसारित झाला. आ. किसन कथोरे यांनी मुरबाड येथील कार्यालयात या कार्यक्रमाचा भाजपा कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यासोबत आस्वाद घेतला. 'मन की बात' या कार्यक्रमाच्या माध्यमातून मोदीजी देशाला नवनवीन संदेश देत प्रेरणादायी यशोगाथा पोहोचवत असतात. त्यामुळे या कार्यक्रमाची देशवासीयांमध्ये मोठी उत्सुकता असते. या संवादातून ग्रामीण भारत, स्वच्छता, शिक्षण, पर्यावरण, महिला सशक्तीकरण, विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवनवीन युवा उपक्रमांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळेच 'मन की बात' हा कार्यक्रम आज देशभरात घराघरात पोहोचलेला असून लोकांच्या पसंतीस उतरलेला आहे. असे मनोगत आ. कथोरे यांनी यावेळी व्यक्त केले.

## कसाऱ्याजवळ भीषण अपघात
### २५ जण जखमी ; ७ जणांची प्रकृती गंभीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर :** मुंबई-नाशिक महामार्गावर कसाराजवळ भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. तीन वाहानांचा भीषण अपघात झाला. ओहोळाची वाडी इथे ट्रक , पिकअप आणि कारची टक्कर झाली. या अपघातात तब्बल 25 जण जखमी झाले. हे सर्व जखमी पिकअपमधील होते. 25 जखमींपैकी 7 जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना एसएमबीटी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.



टाकेद येथील ग्रामस्थ दशक्रिया विधीसाठी डोळखांब इथे आले होते. तेथून ते पिकअपमधून टाकेदला परतत होते. त्याचवेळी कसारा जवळील ओहोळाची वाडी येथे हा अपघात झाला. पिकअप गाडी क्रमांक एम. एच 15 जे डब्लू 1654 च्या चालकाला समोरून येणाऱ्या ट्रकचा अंदाज आला नाही. त्यामुळे पिकअप समोरच्या ट्रकवर जाऊन धडकली. ट्रक क्रमांक एम एच 42 टी. 3636 ला तिने धडक दिली. त्याचवेळी मागून येणारी कार क्रमांक एम एच 03 डी जी 5779 ही सुद्धा पिकअपला धडकली. शुक्रवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. पिकअपला दोन्ही बाजूने जोरदार धडक बसली. त्यामुळे गाडीतील 27 प्रवासी जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच आपत्ती व्यवस्थापन टीम घटनास्थळी दाखल झालं आणि तात्काळ मदतकार्य सुरू केलं. त्यानंतर जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आलं.

**कारमधील एअर बॅगमुळे प्रवासी बचावले**

कारमध्ये एअर बॅग असल्याने अनेक प्रवासी बचावले. एअर बॅगमुळे कारमधील प्रवासी सुखरूप असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या अपघातावेळी कारमधील एअर बॅग उघडल्या. त्यामुळे कारमधील 2 प्रवासी सुरक्षित राहिले. या अपघात प्रकरणी कसारा पोलीस ठाण्यात पिकअप चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कसारा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सुरेश गावीत पुढील तपास करत आहेत.

## मोरा बंदरात खलाशाचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** शनिवारी (२६ जुलै) ला अलिबागच्या खांदेरीच्या परिसरात करंजा येथील एक बोट बुडाल्या नंतर रात्री उशिरा मोरा बंदरात खालाशाना घेऊन येणाऱ्या छोट्या बोटीला अपघात झाला असून यात एकाचा बुडून मृत्यू झाला आहे. सुरेश गौतम (२२) असं या खलाशाच नाव असून तो उत्तर प्रदेशातील रहिवाशी आहे. या संदर्भात मोरा सागरी पोलिसात नोंद करण्यात आली आहे. तर मृत खलाशाचा मृतदेह उरणच्या इंदिरा गांधी रुग्णालयात नेण्यात आला आहे. शनिवारी रात्री ओहटीच्या वेळी मोरा बंदराच्या नजीक असलेल्या मोरा मुंबई रो रो च्या जेट्टी जवळ मोठी मासेमारी बोट उभी करण्यात आली होती. या बोटीच्या दुरुस्ती साठी काही कारागीर छोटी बोट घेऊन गेले होते. ते रात्रीच्या वेळी परतत असतांना समुद्राला आलेली भरती आणि वादळी वाऱ्याने ही सहा ते सात जणांना घेऊन किनाऱ्यावर येणारी बोट उलटली.

## उल्हासनगरातील दहा शाळांना डिजिटल स्मार्ट लूक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर, ता. 27 (बातमीदार):** शाळांचा दर्जा वाढवून विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत वाढ करण्याच्या सकारात्मक उद्देशाने महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे यांनी उल्हासनगरातील १० शाळांना डिजिटल स्मार्ट लूक देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढावी व शाळा खासगी संस्थांइतक्या आकर्षक व्हाव्यात, या उद्देशाने आयुक्त आव्हाळे यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे. सध्या महापालिकेच्या २१ शाळांपैकी १० शाळांमध्ये डिजिटल स्मार्ट लूकचे काम सुरू आहे.

खेमानी येथील महापालिका मराठी व हिंदी शाळाची पुनर्बांधणी करण्यात आली आहे. कॅम्प नं-३, सी ब्लॉक येथील महात्मा ज्योतिबा फुले मराठी शाळेची बहुमजली इमारत बांधून पूर्ण झाली आहे. शाळेशेजारी तळ अधिक एक मजली अद्ययावत अभ्यासिका बांधण्यात आलेली आहे. आयुक्त आव्हाळे यांनी शाळा व अभ्यासिकेची पाहणी करून चांगल्या वास्तू बांधल्याची कबुली दिली आहे. महापालिका शाळा खासगी शाळेच्या तुलनेत अद्ययावत करण्यासाठी आयुक्तांच्या निर्देशानुसार उपायुक्त स्नेहा करपे, उपमुख्य लेखाधिकारी नीलम कदम यांच्या मार्गदर्शनाखाली शाळांची टप्याटप्याने पुनर्बांधणी करण्यात येणार आहे. येत्या वर्षभरात सुरुवातीच्या १० शाळा पूर्णपणे कात टाकणार आहेत. डिजिटल-स्मार्ट लूकमुळे या शाळा लक्षवेधक दिसणार आहेत.

## उध्दव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त गोवेली रुग्णालयात फळ वाटप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेना कल्याण तालुका अध्यक्ष व कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नरेश सुरोशी यांच्या पुढाकाराने गोवेली येथील रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप करण्यात आली, तसेच रुग्णांची चौकशी केली,यावेळी कायैक्रमाला शिवसेनेचे जेष्ठ नेते विश्वनाथ जाधव, माजी उपसभापती रमेश बांगर, युवासेना तालुका अधिकारी प्रविण भोईर, उपतालुकाप्रमुख बळीराम फिंरागणे, मधुकर वाळींबे, बाळाराम रोहणे, आत्माराम भोईर, रमेश सुरोशी, जयराम कोर, मनोहर कोर, हेमंत संते,गोवेली रुग्णालयाचे डॉ अनुप मिश्रा, डॉ आसिफ खान यांच्या सह कर्मचारी उपस्थित होते,

तालुका प्रमुख व कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नरेश सुरोशी यांनी सांगितले की प्रत्येक वर्षी शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांचा वाढदिवसानिमित्त आम्ही सामाजिक उपक्रमानी साजरा करतो, यावर्षी हि गोवेली येथील रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप केले आहेत कल्याण तालुका शिवसेनेचे वतीने आम्ही शुभेच्छा देतो.

## पालघर जिल्ह्यातील धरणे तुडुंब भरली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा जून, जुलैमध्ये 14 टक्के जास्त पाऊस झाला आहे. या घो धो कोसळलेल्या पावसाने पालघर जिल्ह्यामधील धरणे ओव्हरफ्लो झाली असून धामणी, कवडास, वांद्री प्रकल्पांचे दरवाजे उघडले आहेत. याबरोबरच अन्य मोठे बंधारेदेखील ओसंडून वाहत आहेत. त्यामुळे नागरिकांची पाणी चिंता मिटली आहे. त्याचबरोबर शेतीच्या सिंचनलाही मुबलक पाणी मिळणार आहे. या महिन्यात 577.8 मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे.

पालघर जिल्ह्यात धामणी, कवडास, बांद्री ही प्रमुख धरणे असून मनोर, माहीम-केळवा, देवखोप, रायतळे, खांड आणि मोह खुर्द हे बंधारे आहेत. जिल्ह्यातील सूर्या धरण प्रकल्पातील धामणी आणि कवडास धरणातून डहाणू, बोईसर, पालघर, वसई-विरार महानगरपालिकांसह अदानी औष्णिक वीज प्रकल्प, तारापूर अणुऊर्जा प्रकल्प, तारापूर एमआयडीसी यासारख्या मोठ्या उद्योगांना पाणीपुरवठा केला जातो. सोबतच जिल्ह्यातील इतर लहान धरणांवर गावपाड्यातील पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत. रब्बी हंगामात सूर्या आणि वांद्री धरण प्रकल्पांतून डहाणू आणि पालघर तालुक्यातील पाच हजारांपेक्षा जास्त हेक्टरवरील शेतीला सिंचनाचे पाणी पुरविले जाते.




## केडीएमसीच्या जाईबाई शाळेतील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली शिक्षण विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या कल्याण पूर्वेतील जाई बाई शाळेतील मुलांना पालक अधिकारी विद्युत कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांच्या माध्यमातून अनोखी भेट मिळाल्याने विद्यार्थी प्रफुल्लित झाले.

केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांनी महापालिका अधिकाऱ्यांकडे शाळांचे पालकत्व देत. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक आलेख आणि प्रगतीसाठी महिन्यातून परिक्षा घेत प्रगती आढावा सुरू केला. तर केडीएमसी आयुक्त यांनी मनपा शाळेत जाऊन तासभर विद्यार्थ्यांना शालेय धडे देत प्रशासनाने मनपा शाळा स्मार्ट होणार या बाबत कंबर कसली आसल्याचे कृतीद्वारे दाखवून दिले.



या अनुषंगाने केडीएमसीच्या जाईबाई शाळेचे पालक अधिकारी म्हणून दायित्व घेतलेले कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत यांनी शाळेतील समस्या जाणून घेतल्या. त्यासाठी त्यांनी माजी नगरसेवक मनोज राय यांच्याकडे मदत मागत शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे दफ्तर आणि आरओ युक्त कुलरची व्यवस्था करून देत शाळेतील विद्यार्थ्यांना सुविधा करून दिली. तसेच शाळा वर्गखोल्या बाहेरील परिसरात कॉंक्रीटकरण काम करून शाळा परिसर स्वच्छता संदर्भात पाऊल पुढे टाकले.

नुकतेच शाळेत माजीनगरसेवक मनोज राय यांच्या वतीने प्रशांत भागवत यांच्या उपस्थितीत जाई बाई शाळेतील विद्यार्थ्यांना दफ्तर वाटप, कुलर व्यवस्था कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी माजी भाजपा जिल्हाध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशी, माजी परिवहन सभापती सुभाष म्हस्के, सुदाम पावशे आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते. मनोज राय यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांना यंदा विद्यार्थी सूचविलेल्या ठिकाणी शिक्षकासह सहलीला नेण्याचे आश्वसन दिले. या शाळेतील विघार्थी पटसंख्या सद्यस्थितीत 34 असून पुढच्या वर्षी विघार्थी संख्या 340झाली तरी आपण विद्यार्थ्यांना पुढच्या वर्षी देखील सहलीला नेणार असे सांगत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देखील देत पटसंख्या वाढीसाठी शिक्षकांना प्रोत्साहित केले.

राय यांच्या सहल, शालेय साहित्य देण्याच्या आश्वसनामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर यानिमित्ताने आनंद निर्माण झाल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत होते. जाई बाई शाळेतील विघार्थी सोयी सुविधा कशा मार्गी लागतील यासाठी पालक अधिकारी प्रशांत भागवत यांनी प्रस्ताव बनविणे हे टाळत लोकसहभागातून शाळेतील सुविधा प्रश्न देखील मार्गी लागु शकतात हे यानिमित्ताने दाखविले आहे.

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

दुरध्वनी क्र. ०२५१-२२०३६२१

**मालमत्ता विभाग**

**जाहिर निविदा सुचना क्र. ८ सन २०२५-२६**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ अन्वयेच्या तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या समावेशक आरक्षणाअंतर्गत महिला कल्याण केंद्र (WWC), व्यायामशाळा, शॉपिंग सेंटर या मालमत्ता १० वर्षेसाठी भाडेतत्वावर व्यक्तिंना / संस्थांना देणेबाबत.

१) निविदा विक्री दि. २८/०७/२०२५ ते दि. ११/०८/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदा स्विकृती दि. २८/०७/२०२५ ते दि. ११/०८/२०२५ रोजी वेळ सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत राहील.
३) निविदा पूर्व बैठक दि. ०६/०८/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता मा. उप आयुक्त (मालमत्ता) कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
४) शक्य झाल्यास दि. १२/०८/२०२५ रोजी सायंकाळी ३.०० वाजता ई-टेंडरींग विभाग नागरिक सुविधा केंद्र, येथ उघडण्यात येईल.
५) निविदा महापालिकेच्या www.mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.

सर्व निविदा किंवा कोणत्याही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवला आहे

जावक क्रमांक :
कडोंमपा/जसवि/मुका/३३५
दिनांक : २५ जुले २०२५

सही /-
उप आयुक्त (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार ■ २८ जुलै २०२५
४
jeevandeepvartanews2020@gmail.com

# तेराव्या माळ्यावरून तोल गेला - चिकनघरमध्ये रंगारीचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील चिकनघरमध्ये एका इमारतीच्या तेराव्या माळ्यावरील सदनिकाच्या खिडकीच्या बाजुला रंगकाम करत असलेला एक ४६ वर्षीय रंगारी तोल जाऊन इमारती खालील खोल खड्डयात पडला. या रंगारीला तात्काळ इतर साथीदारांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. तेथे दाखल केल्यानंतर तपासून त्यांचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले.

मणकेश सिताराम चव्हाण (४६) असे रंगाऱ्याचे नाव आहे. ते रंगारी म्हणून काम करतात. ते मूळचे उत्तरप्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यातील सियारामपूर गावचे रहिवासी आहेत. कल्याण, डोंबिवली परिसरातील नवीन, जुन्या इमारतींना रंग देण्याचे काम ते आपल्या सहकाऱ्याच्या मदतीने करतात. या मजुराच्या मृत्युप्रकरणी कामगार ठेकेदार गुड्डुकुमार कसौधन (३५) यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात माहिती दिली. पोलिसांनी तपास करून भारतीय न्याय संहितेच्या २०२३ कलम १९४ प्रमाणे अपमृत्युची नोंद केली आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक बळीरामसिंग परदेशी, पोलीस निरीक्षक विजय नाईक, पोलीस उपनिरीक्षक दिलीप जाधव यांनी घटनास्थळी भेट दिली. या घटनेची पोलिसांनी माहिती घेतली. या माहितीच्या आधारे आणि तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीप्रमाणे पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली. साहाय्यक पोलीस निरीक्षक हुनमंत हुंबे याप्रकरणाचा तपास करत आहेत.

## युवा पिढी दहशतवादाकडे वळते हा चिंतेचा विषय - निवृत्त न्यायाधीश परमज्योत सिंग

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**कल्याण :** सध्या प्रत्येक गोष्टीत दहशतवाद दिसतो. युवा पिढी दहशतवादाकडे जास्त वळताना दिसून येते यावर चिंतन करण्याची वेळ आली असल्याचे मत निवृत्त न्यायाधीश परमज्यौत सिंग यांनी व्यक्त केले. शेठ हिराचंद मुथा महाविद्यालय आणि शेठ हिराचंद मुथा सीबीएससी स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने कारगिल विजय दिवसानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

भारतीय शस्त्र दलांच्या शौर्य व बलिदानाला महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातर्फे जे यु ओ ओमकार कुंभार, सीएसएम प्रांजल बेतालु, एसजिटी हिमेश जाधव, सी पी एल प्रणय भंडारी, तिशा द्विवेदी, एलसीपीएल मानसी द्विवेदी ,पियुष देवरे, शैलेश गुप्ता यांच्यातर्फे शस्त्र सलामी देण्यात आली. तसेच एसयुओ मयुरेश घुगे यांनी आजपर्यंत तीनही सेनादलातर्फे यशस्वी झालेल्या युद्धांचा आढावा पीपीटीच्या माध्यमातून घेतला.

कारगिल युद्धाच्या वेळी आपल्या जवानांना जगातील सर्वात दुर्गम भागात लढा द्यावा लागला आणि शत्रुवर विजय मिळवला. आपल्या सैनिकांचे शौर्य आणि बलिदान येणाऱ्या पिढ्यांना प्रेरणा ठरतील असे मत मुथा महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रकाश मुथा यांनी व्यक्त केले. याप्रसंगी शिक्षण तज्ञ दौलतसिंग पालिवाल, मुथा महाविद्यालयाच्या ट्रस्टी अन्वेषा मुथा, प्राचार्य अनुजा ब्रह्म शेठ, हिराचंद मुथा सीबीएससी स्कूल प्राचार्य सपना गादिया, सीबीएससी कॉलेज प्राचार्य दिपाली कांबळे, डॉ अजय पिल्ले , एनसीसी प्रमुख डॉक्टर विनिता हुबळीकर आणि इतर मान्यवर उपस्थित होते.



## मुरबाड तालुका कुणबी समाजोन्नती मंडळाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव व सन्मान सोहळा संपन्न!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
दिलिप पवार

**मुरबाड :** मुरबाड तालुका कुणबी समाजोन्नती मंडळाच्या वतीने विद्यार्थी गुणगौरव व सन्मान सोहळा मोठया उत्साहात रविवार दि.27 जुलै रोजी कुणबी भवन मुरबाड येथे पार पडला.या सन्मान सोहळयास मुरबाड विधानसभेचे विद्यमान आमदार किसन कथोरे व माजी आमदार गोटिरामभाऊ पवार उपस्थित राहून विद्यार्थ्यांना त्यांच्या हस्ते गौरविण्यात आले व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.सन 2024 -25 या शैक्षणिक वर्षात कुणबी समाजातील विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवलेल्या एकुण 300 गुणवंताना यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. यामध्ये एम.पी.एस.सी. स्पर्धा परिक्षा उत्तीर्ण 6 विद्यार्थी 2 पी.एस.आय.,1 कर निरिक्षक, 2 कर सहाय्यक , 1 महसूल साह्यायकांचा समावेश आहे तर वैद्यकीय विभाग- 16, सनदी लेखापाल, विधी व्यवस्थापन , उच्च पदवी- 16, विद्यावाचस्पती (पी.एच.डी.)-9,विशेष सेवा पुरस्कार -10,अभियांत्रिकी आणी वास्तुविशारद-32,औषध निर्माण-8,पदवी आणी पदवीत्तर , बारावी कला,वाणिज्य व विज्ञान शाखा, तसेच इयत्ता दहावी मधे विशेष गुण संपादन केलेल्यांचा यथोचित गौरव यावेळी करण्यात आला.कोरोना महामारी नंतर अशा स्वरूपाचा भव्य कार्यक्रम समाजोन्नती मंडळाकडून झाला नव्हता परंतु मंडळाचे नुतन अध्यक्ष गणपत विशे , सचिव अरविंद विशे,उपाध्यक्षा ज्योती ताई गोडांबे व सर्व संचालक मंडळ यांनी यावर्षीचा गुणगौरव सोहळा मोठया उत्साहात साजरा केला. या सोहळयासाठी मा.अध्यक्ष शांताराम बांगर, उल्हास बांगर,जयराम पडवळ, सुभाष घरत, आत्माराम सासे,रामभाऊ दळवी, बाळू करलग, मधुकर मोहपे, प्रकाश पवार, दिपक पवार,भास्कर हरड,पांडुरंग कोर, मोहन सासे, संतोष विशे,पंढरी आलम, सुवर्णाताई ठाकरे, प्राजक्ता भावार्थे,धनाजी दळवी,मनोहर ईसामे, मिलींद मडके, रमेश तुंगार, यांच्यासह मोठ्या संख्येने कुणबी समाज बांधव, विद्यार्थी व पालक वर्ग उपस्थित होते. या सदाबहार कार्यक्रमाचे सुत्रसंचालन विनोद कोर व राजकुमार कडव यांनी केले.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर भीषण अपघात
### एका महिलेचा मृत्यू ; १९ जण जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**खोपोली, ता. २६**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर बोरघाटातील आडोशी बोगद्यात शनिवारी (ता. २६) दुपारी एक वाजता ब्रेक निकामी झालेल्या ट्रकने १७ ते १८ वाहनांना धडक दिली. या भीषण अपघातात अनिता सहदेव एकंडे या महिलेचा मृत्यू झाला, तर १९ जण जखमी झाले आहेत.

पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या ट्रकचा आडोशी बोगद्यात ब्रेक निकामी झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटून हा अपघात झाला. या विचित्र अपघातात अपघातानंतर वाहतूक पाऊण तास वाहतूक विस्कळित झाली होती. घटनेची माहिती मिळताच द्रुतगती मार्गावरील सर्व यंत्रणा, हेल्प फाउंडेशन, खोपोली पोलिस यंत्रणेने तातडीने मदतकार्य सुरू करून जखमींना खोपोलीतील नगरपालिका आणि अन्य रुग्णालयांत दाखल केले आहे. या अपघातात वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.



## भिवंडी पोलिसांच्या कारवाईत चार फरार गुन्हेगारांना अटक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
**भिवंडी, ता. २६ (बातमीदार)**

भिवंडी पोलिसांनी नुकतेच तीन वेगवेगळ्या भागात केलेल्या कारवाईत चार फरार गुन्हेगारांना अटक केली आहे. या कारवाईदरम्यान, पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून तीन बेकायदा शस्त्रेही जप्त केली. शांतीनगर पोलिसांनी अशोकनगर परिसरातून अब्दुल्ला मुनवर मोमीन याला शस्त्रासह अटक केली. तो प्रतिबंधित क्षेत्रात बेकायदा प्रवेश करताना आढळला. त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत. त्याचप्रमाणे, भोईवाडा पोलिसांनी ओसामा मेहबूब खान याला अटक केली असून, त्याच्याकडून देशी चाकू जप्त केला आहे. तो हद्दपारी आदेशाचे उल्लंघन करत परिसरात घुसला होता. नारपोली पोलिसांनी अनिल चव्हाण याला प्रतिबंधित क्षेत्रात फिरताना पकडले. त्याच्याकडेही घातक शस्त्र होते. दुसऱ्या घटनेत, विकास ऊर्फ शेंग्या मुनकुड धोत्रे यालाही हद्दपारीचे आदेश धाब्यावर बसवल्याप्रकरणी अटक करण्यात आली. त्याच्याकडूनही शस्त्र जप्त करण्यात आले. पोलिसांनी अशा गुन्हेगारांवर कडक नजर ठेवण्याचे सांगितले आहे.

## ठाणे महापालिकेचे नागरिकांना पाणी गाळून आणि उकळून पिण्याचे आवाहन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

गेले काही दिवस भातसा धरण क्षेत्रात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे ठाणे महापालिकेच्या पिसे पंपिंग स्टेशन येथील नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात गाळ, कचरा, व झाडांच्या फांद्या जमा झाल्या आहेत. त्यामुळे मागील दोन दिवसापासून पूर्ण क्षमतेने पंपिंग होत नाही. तसेच, गढूळपणामुळे शुद्धीकरणाच्या प्रक्रियेवर परिणाम होत असल्यामुळे ठाणे शहराकडे येणारा पाणीपुरवठा कमी झाला आहे. पंपाच्या स्टेनरमधील गाळ काढण्याचे काम युद्धपातळीवर करण्यात येत आहे. या कारणामुळे आज, रविवार, २७ जुलै, २०२५ रोजी दुपारपर्यंत पाणीपुरवठा बंद राहील.तसेच, पुढील दोन दिवस अपुऱ्या प्रमाणात व अनियमित पाणीपुरवठा होईल याची नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी.या काळात पाणी उकळून प्यावे आणि पाण्याचा वापर जपून करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

## भारतीय मजदूर संघाच्या वतीने डोंबिवलीत गौरव यात्रेचं आयोजन

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** भारतीय मजदूर संघ ही भारतातील क्रमांक एकची गैर राजकीय देशभक्त कामगार संघटना आहे. २३ जुलै १९५५ रोजी दत्तोपंत ठेंगडी यांनी भारतीय मजदूर संघाची भोपाळ येथे स्थापना केली. तेव्हापासून आजपर्यंत भारतीय मजदूर संघ देशातील संघटित तसेच असंघटित क्षेत्रातील कामगारांना एकत्र करत आहे. त्यांच्या न्याय हक्क मागण्यासाठी लढत आहे. भारतीय मजदूर संघाने आपल्या स्थापनेची सत्तर वर्ष पूर्ण केलेले आहे. भारतीय मजदूर संघाचा ७० वर्षाचा हा स्वर्णिम प्रवास संपूर्ण देशभर साजरा होत आहे. त्यानिमित्ताने संपूर्ण देशभर गौरव यात्रेचे आयोजन करण्यात आलेले आहे. भारतीय मजूर संघ ठाणे जिल्ह्याच्या वतीने कारगिल विजय दिवशी या गौरव यात्रेचे डोंबिवली नगरीमध्ये आयोजन करण्यात आले होते. डोंबिवली पूर्व टिळक नगर येथे असलेल्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पूर्णकृती पुतळयाला पुष्पहार अर्पण करून या गौरव यात्रेला प्रारंभ झाला.

## पावसामुळे भिवंडीचं जनजीवन विस्कळीत
### भाजीपाला मार्केटमध्ये घाण आणि दुर्गंधीचे साम्राज्य



दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शरद भसाळे

**भिवंडी :** भिवंडी शहर परिसरात सतत पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे सर्वत्र जनजीवन विस्कळीत झाल्याचे दृश्य दिसत आहे.खराब रस्त्यावर पडलेल्या खड्डयांमध्ये पावसाचे पाणी साचल्यामुळे पादचारी नागरिक व वाहन चालकांना रस्त्यावर आपली वाहन चालवताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.अनेक ठिकाणी महापालिका प्रशासनाच्यावतीने खड्डे भरण्यासाठी मोठाले दगड व कचरा युक्तमाती टाकण्यात आल्यामुळे धामणकर नाका - कुंभार आळी रस्त्यावर चिखल झाला आहे.भाजीपाला मार्केट सह अन्य ठिकाणी ठिकाणी रस्त्यावर साठलेला कचरा उचलला न गेल्यामुळे ओल्या कचऱ्याला दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे पादचारी महिला व नागरिकांना नाक मुठीत धरून पादक्रम करावे लागत आहे.पवित्र श्रावण महिन्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे सोमवारी मोठ्या संख्येने भाविक कणेरी येथील रामेश्वर मंदिर व विविध ठिकाणी असलेल्या

" भगवान शंकर " चे देवळात जात आहेत.सदर परिसरात सुध्दा अस्वच्छता निर्माण झाली आहे त्यामुळे महापालिकेच्या आयुक्त अनमोल सागर यांनी या प्रकरणी लक्ष घालून शहरात विविध ठिकाणी असलेल्या मंदिर परिसरात विशेष स्वच्छता मोहीम व जंतुनाशक औषध फवारणी करावी अशी मागणी होत आहे.

गेल्या दोन दिवसापासून भिवंडी शहर व ग्रामीण भागात पडत असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असुन नागरीकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. भिवंडी वाडा या रस्त्याची अत्यंत दैना झाली असून ठीक ठिकाणी रस्त्यावर मोठाले खड्डे झाल्यामुळे अपघात व वाहतूक कोंडीचा गंभीर प्रश्न गेल्या वर्षभरापासून नागरिकांना सतावत आहे याबाबत शासन दरबारी क्षमयी संघटना व इतर राजकीय पक्षांनी तक्रारी करून सुद्धा दुर्लक्ष होत असल्यामुळे नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे तर मुंबई नाशिक भिवंडी बायपास महामार्गाचे प्रस्ताव वर्गीकरण काम कासवगतीने सुरू असल्यामुळे रस्त्यावर पाणी साचून वाहनांची गती मंदावली आहे त्यामुळे या मार्गावर सुद्धा वाहतूक कोंडी होत असल्यामुळे नोकरदार वर्ग विद्यार्थी व व्यावसायिक प्रवासी नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे सतत कोसळलेल्या पावसामुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली असून पोलिसांना वाहतूक सुरळीत करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. सुरू असलेल्या पावसामुळे शिवाजीनगर भाजीपाला मार्केट,पद्मानगर भाजीपाला मार्केट, कामतघर भाजीपाला मार्केट, भोईवाडा कोंबडी बाजार मोहल्ला अशा विविध ठिकाणी रस्त्यावर पाणी साचून चिखल निर्माण झाला आहे. कचऱ्याला दुर्गंधी पसरली आहे त्यामुळे बाजारात सामान खरेदी करण्यासाठी आलेल्या महिला व नागरीकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

## शहाड स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी इतिहासजमा होणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : नागरिकांची वाढती गर्दी, रस्त्यावर अस्ताव्यस्त उभ्या राहणाऱ्या वाहनांमुळे शहाड रेल्वे स्टेशनच्या पूर्व भागात आणि शिवाजी रोड परिसरात रोजची वाहतूक कोंडी आता इतिहासजमा होणार आहे. ठाणे वाहतूक विभागाने एक मोठा निर्णय घेत, शहाड स्टेशन परिसरात "नो पार्किंग" झोन तर महात्मा फुले चौक ते स्टेशन चौकदरम्यान "पी-१ आणि पी-२ पार्किंग झोन" जाहीर केले आहेत. पोलीस उपआयुक्त (वाहतूक), ठाणे शहर पंकज शिरसाट यांच्या आदेशानुसार ही अधिसूचना ३० दिवस प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात आली असून नागरिकांच्या प्रतिसादानुसार ती कायमस्वरूपी केली जाणार आहे. शहाड रेल्वे स्टेशनच्या पूर्व प्रवेशद्वार परिसरात अनधिकृत पार्किंगमुळे प्रवाशांना आणि स्थानिकांना तासन्तास वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत होता. याच पार्श्वभूमीवर वाहतूक विभागाने पुढील ठिकाणी नो पार्किंग झोन घोषित केले आहेत. या ठिकाणी केवळ रिक्षा स्टँडवरील अधिकृत रिक्षा वगळता अन्य कोणतेही वाहन पार्किंगसाठी उभे करता येणार नाही.

## सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या वतीने कारगिल विजय दिवस साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
पेण ( प्रतिनिधी )

कारगिल युद्धात आपल्या भारतीय जवानांनी पाकिस्तानवर विजय मिळवून तिरंगा फडकवला हा दिवस म्हणजे कारगिल विजय दिवस. दरवर्षी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानच्या माध्यमातून पोलिस प्रशासन आणि माजी सैनिकांना सोबत घेऊन साजरा केला जातो. महात्मा गांधी वाचनालयाच्या सभागृहात देखील हा विजय दिवस पार पडण्यात आला. यावेळी माजी सैनिक जनार्दन म्हात्रे यांनी बोलताना सीमेवर युद्ध जिंकण्यासाठी सीमेसह देशांतर्गत एकजूट देखील तेवढीच महत्वाची असते असे सांगितले. यावेळी विजय दिवस साजरा करण्यासाठी महिला पोलिस अधिकारी शिल्पा वेंगुर्लेकर, माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सुरेंद्र ठाकूर, सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे महाराष्ट्र राज्य कार्याध्यक्ष समीर म्हात्रे, तालुका अध्यक्ष साईराज कदम यांसह पोलिस कर्मचारी, माजी सैनिक, सह्याद्री प्रतिष्ठानचे मावळे आणि नागरिक उपस्थित होते. कारगिल युद्ध सुरू असताना मी त्या युद्धाचा एक भाग म्हणून मला त्याठिकाणी उपस्थित रहायला मिळाले हे देशभक्त म्हणून मी माझे भाग्य समजतो असे माजी सैनिक जनार्दन म्हात्रे यांनी सांगून आम्ही देशासाठी लढत असताना फक्त सीमेवरच नाही तर त्यावेळची देशांतर्गत एकजूट ही आमच्यासाठी स्फूर्ती देणारी असते. त्यामुळे देशाच्या सीमेवर कोणतेही युद्ध सुरू असताना लहान मुलांपासून अगदी सर्वच स्तरातून सैनिकाला प्रोत्साहन देण्याचे काम नागरिकांनी करणे गरजेचे आहे असे सांगितले. तर पोलिस अधिकारी शिल्पा वेंगुर्लेकर यांनी सांगितले की पोलिस दलात सराव चाचणी करत असताना सीमेवर सैनिक चोवीस तास डोळ्यात तेल घालून कसे सज्ज असतात हे पाहिले आहे, ते सीमेवर आहेत म्हणून देशांतर्गत नाकाबंदी करताना आमच्यावरील ताण कमी असतो असे सांगितले. यावेळी समीर म्हात्रे यांनी देखील सैनिकांप्रती बोलताना सांगितले की जवानांनी कारगिल युद्धात जे शौर्य गाजवले ते कधीही न विसरण्यासारखे आहे, त्यामुळे आजचा हा दिवस एक सण आहे असे समजून आम्ही दरवर्षी साजरा करतो आणि यापुढे देखील करत राहणार असे सांगितले.

## सुमित कंपनीचा ठेका रद्द न केल्यास न्यायालयात धाव घेणार
### जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांचा इशारा

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाचा ठेकेदार सुमित कंपनी वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सुमित कंपनीचा डायरेक्टर अमित साळुंखेला झारखंड रांचीमध्ये पोलिसांनी एका घोटाळयासंदर्भात अटक केली आहे. केडीएमसीने नियम डावलून सुमित कंपनीला कॉन्ट्रॅक्ट दिले असून टेंडर दिल्यानंतर सुमित कंपनीची स्थापना केली असल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख दिपेश म्हात्रे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

यावेळी कल्याण लोकसभा जिल्हा संघटक वैशाली दरेकर, शहर प्रमुख प्रकाश तेलगोटे हे उपस्थित होते.

पेस्ट कंट्रोल आणि हाऊसकिपिंगचा अनुभव असणाऱ्या ठेकेदाराला केडीएमसीने काम दिलं आहे. भविष्यात काही अडचणी येण्या पेक्षा आताच या कंपनीचा ठेका रद्द करण्याची मागणी यावेळी म्हात्रे यांनी केली. झारखंडला दारू घोटाळयात ज्या कंपनीच्या संचालकाला अटक केली त्या कंपनीला केडीएमसीने काम दिले आहे. ठेकेदाराकडून पैसे घेण्यासाठी काम दिल्याचा संशय ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख दिपेश म्हात्रे यांनी व्यक्त केला आहे. तर केडीएमसीने ठेका रद्द केला नाहीतर न्यायालयात धाव घेण्याचा इशारा ठाकरे गटाने यावेळी दिला आहे.

## केडीएमसी प्रशासनाकडून तीन शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केडीएमसीच्या शाळा क्रं 19मधील तीन शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस बजावल्याने 38 मुख्याध्यापकांना काही दिवसांपूर्वी दिलेल्या कारणे दाखवा नोटीस नंतर तीन शिक्षकांना कारणे दाखवा नोटीस दिल्याने शिक्षक देखील रडावर आले असल्याचे दिसत आहे.

कल्याण डोंबिवली शिक्षण विभागाच्या मनपाच्या 61 शाळांपैकी सुमारे 38 मुख्याध्यापकांना प्रशासनाने कारणे दाखवा नोटीसा काही दिवसांपूर्वी बजावल्या होत्या. नुकतेच नेतवली येथील मनपा शाळा क्रं 19 प्रबोधनकार ठाकरे शाळेतील तीन शिक्षकांना मासिक अभ्यासक्रम विघार्थी चाचणी अंतर्गत काही विद्यार्थ्यांमध्ये प्रगती न आढळल्याचा ठपका ठेवत शिक्षण विभाग उप आयुक्त यांनी कारणे दाखवा नोटीस बजावल्याने कामचुकार कर्तव्यात कुसूर करणार्या शिक्षकांची देखील आता खैर नसल्याचे दिसत आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण विभाग उपआयुक्त यांनी केडीएमसी अधिकाऱ्यांना शाळांची पालकत्व जबाबदारी देत शाळातील शिक्षण दर्जा सह सोयी सुविधा आढावा घेत त्या मार्गी लावण्यासाठी वॉंच आहे. नुकताच प्रबोधनकार ठाकरे शाळेचा पाहणी दौरा आयुक्तांनी केला. 1ली ते 8 वी पर्यंत सुमारे 450 विद्यार्थी पटसंख्या असलेल्या या शाळेतील शिक्षकांना विद्यार्थ्यान शैक्षणिक धडे बरोबर देण्यासंदर्भात धारेवर धरले होते. एकंदरीत पाहता मनपा शाळेतील विद्यार्थी शैक्षणिक दर्जा गुणवत्ता,सोयी सुविधा बाबत प्रशासनाने दक्ष भुमिका घेतल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.




Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.